मंगळवार दि. ०१ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ०१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेध्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## गणेशोत्सव, नवरात्रोत्सव व दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मनपाची लगबग

### मूलभूत सुविधांना गती देण्याच्या सूचना; उपमहापौर राजेश राऊत यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

**जालना | प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. या पार्श्वभूमीवर उपमहापौर राजेश राऊत यांच्या उपस्थितीत सोमवारी आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी शहरातील स्वच्छता, आरोग्य, रस्ते, पथदिवे, मोकाट जनावरे तसेच गणेशमूर्ती विसर्जनस्थळांवरील आवश्यक सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यापूर्वी १८ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत विविध विभागांना देण्यात आलेल्या सूचनांनुसार किती कामे पूर्ण झाली, कोणती कामे प्रलंबित आहेत आणि आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, याबाबत संबंधित विभागांकडून प्रगती अहवाल सादर करण्यात आला. या अहवालाचा आढावा घेताना शहरातील विविध मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळी या काळात शहरात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढते. विविध मंडळांचे कार्यक्रम, धार्मिक स्थळांवरील गर्दी तसेच बाजारपेठांमध्ये होणारी खरेदी लक्षात घेता शहरातील स्वच्छता व्यवस्था सक्षम ठेवण्याची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर स्वच्छता विभागाने नियमित साफसफाईबरोबरच गर्दीच्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. सणांच्या काळात कचरा साचू नये,



सार्वजनिक ठिकाणे अस्वच्छ राहू नयेत आणि नागरिकांना स्वच्छ वातावरण मिळावे, यासाठी संबंधित यंत्रणांनी नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले. शहरातील मोकाट कुत्रे आणि मोकाट जनावरांचा प्रश्नही बैठकीत चर्चेला आला. सणांच्या काळात रस्त्यांवर नागरिकांची वर्दळ वाढत असल्याने मोकाट जनावरांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याबरोबरच अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मोकाट कुत्रे आणि जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, अशा सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या. विशेषतः गर्दीची ठिकाणे, प्रमुख रस्ते आणि बाजारपेठांच्या परिसरात याबाबत अधिक दक्षता घेण्यावर भर देण्यात आला. पावसाळ्यामुळे शहरातील विविध रस्त्यांवर निर्माण झालेले खड्डे नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहेत. सणांच्या काळात वाहतूक वाढणार असल्याने खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन रस्त्यांची पाहणी करून आवश्यक ठिकाणी तातडीने खड्डे बुजवावेत, अशा सूचना देण्यात आल्या.

मुख्य रस्ते, गणेश मंडळांच्या मिरवणुकीचे संभाव्य मार्ग, विसर्जनस्थळांकडे जाणारे रस्ते तसेच बाजारपेठ परिसरातील रस्त्यांना विशेष प्राधान्य देण्याची गरज व्यक्त करण्यात आली. शहरातील नाल्यांवरील खराब किंवा तुटलेले ढापे नागरिकांसाठी धोकादायक ठरू शकतात. विशेषतः रात्रीच्या वेळी पथदिवे बंद असल्यास अशा ठिकाणी अपघाताचा धोका वाढतो.

त्यामुळे नाल्यांवरील ढाप्यांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती तसेच नवीन ढापे बसविण्याचे काम तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.

शहरातील विद्युत पोलवरील बंद असलेल्या पथदिव्यांची दुरुस्ती करण्याच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. सणांच्या काळात रात्रीच्या वेळी नागरिकांची वर्दळ वाढत असल्याने प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा, धार्मिक स्थळांकडे जाणारे मार्ग आणि सार्वजनिक ठिकाणी पुरेसा प्रकाश असणे आवश्यक आहे. त्यामुळे बंद पथदिव्यांची यादी तयार करून त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, असे निर्देश विद्युत विभागाला देण्यात आले. *(पान २ वर)*

## शनी मंदिर चौकात सलग तीन दिवस वाहतूक कोंडी; आज तब्बल तासभर वाहनचालक अडकले

### वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा; नागरिकांकडून वाहतूक पोलिसांच्या तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी

**जालना | प्रतिनिधी**

जालना शहरातील शनी मंदिर चौकात गेल्या तीन दिवसांपासून सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून, सोमवारी या कोंडीने गंभीर स्वरूप धारण केले. आज तब्बल एक तास या चौकात वाहनांच्या रांगा लागल्याने वाहनचालक, नागरिक आणि पादचाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.



शनी मंदिर चौक हा शहरातील महत्त्वाचा वर्दळीचा भाग असून या परिसरातून दिवसभर मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी तसेच इतर वाहने ये-जा करतात. मात्र, गेल्या तीन दिवसांपासून वाहतूक नियमन प्रभावीपणे होत नसल्याने चौकात वारंवार कोंडी होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यापूर्वीही या चौकातील वाहतूक कोंडीचा प्रश्न समोर आला आहे. सोमवारी दुपारच्या सुमारास वाहतूक कोंडी वाढत गेल्याने चौकातील रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. काही वाहनचालकांना बराच वेळ जागेवरच थांबावे लागले. त्यामुळे कामानिमित्त बाहेर पडलेले नागरिक, व्यापारी तसेच विद्यार्थ्यांचीही गैरसोय झाली.

चौकातील वाहतुकीचे योग्य नियोजन, वाहनांची शिस्त, पार्किंग व्यवस्था आणि वाहतूक पोलिसांची नियमित उपस्थिती याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज *(पान २ वर)*

## परतूर शहरात अवैध गुटखा वाहतूकीवर पोलिसांची कारवाई

### ७४ हजारांच्या प्रतिबंधित गुटख्यासह दुचाकी जप्त

**परतूर - प्रतिनिधी**

शहरात अवैध धंद्यांवर कारवाईसाठी गस्तीवर असलेल्या पोलिसांच्या पथकाने जय मल्हार चौक परिसरात एका दुचाकीस्वाराला रंगेहात पकडले. त्याच्या ताब्यातून तब्बल ७४ हजार रुपये किमतीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला, तंबाखू आणि एक मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, शुक्रवारी (दि. २९) रोजी सकाळी ७:४५ वाजता परतूर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार गोविंद पवार हे त्यांचे सहकारी पोहेकॉ अशोक गाढवे आणि विजय जाधव यांच्यासह हद्दीत पेट्रोलिंग करत होते. यादरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम मोटारसायकलवरून प्रतिबंधित गुटखा घेऊन वखार महामंडळ रोडने जात आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार पोलिसांनी पंचांसमक्ष जय मल्हार चौक येथे सापळा रचला.

यावेळी एका हिरो पॅशन (एमएच २१ सीई ७२६६) क्रमांकाच्या दुचाकीवरून जाणाऱ्या एका इसमास थांबवून पंचांसमक्ष त्याची अंगझडती व वाहनाची तपासणी केली असता, त्याच्याकडे वायरच्या पिशव्यांमध्ये विविध कंपन्यांचा मानवी आरोग्यास अपायकारक असलेला प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तंबाखू मिळून आला.

जप्त *(पान २ वर)*

## जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध

### ३० सप्टेंबरपर्यंत हरकती व दावे दाखल करण्याची संधी; १ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम यादीची तयारी

**जालना- प्रतिनिधी**

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदारयादी सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप मतदारयादीबाबत नागरिकांना दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर प्राप्त दावे-हरकतींची छाननी करून १ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत भारत निवडणूक आयोगाच्या नवी दिल्ली येथील पत्रानुसार ही प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांतील मतदारांची नोंदणी भारत निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणी नियम, १९६० नुसार करण्यात आली असून, एक प्रत सर्व मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी तसेच मतदान केंद्र कार्यालयांमध्ये पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**पाच मतदारसंघांत १६ लाख ८२ हजार ७२३ मतदार**

जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघांच्या प्रारूप मतदारयादीतील आकडेवारीनुसार एकूण १६ लाख ८२ हजार ७२३ मतदार फॉर्म आहेत. यामध्ये एकूण १४ लाख ३९ हजार ५३६ मतदारांची नोंदणी डिजिटल पद्धतीने पूर्ण झाली असून, २ लाख ४३ हजार १८७ मतदारांची नोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही, अशी माहिती देण्यात आली आहे.

**मतदारसंघनिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे**

विधानसभा मतदारसंघ
९९-परतूर मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म २,९०,०३१ तर न गोळा झालेले फॉर्म ४०,३४६ आणि एकूण मतदार ३,३०,३७७ आहेत. तर १००-घनसावंगी मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म २,९९,७२८ तर न गोळा झालेले फॉर्म २८,८७८ आणि एकूण मतदार ३,२८,६०६
१०१-जालना मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म २,५९,२७९ तर न गोळा झालेले फॉर्म ९९,३५८ आणि एकूण मतदार ३,५८,६३७
१०२-बदनापूर मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म ३,०२,६३८ तर न गोळा झालेले फॉर्म ३६,२९८ आणि एकूण *(पान २ वर)*

## तिसऱ्या श्रावण सोमवारी पंचमुखी महादेव मंदिरात भक्तांची मांदियाळी

### महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी; 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला

**जालना | प्रतिनिधी**

श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी जालना शहरातील प्रसिद्ध पंचमुखी महादेव मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिराकडे धाव घेतल्याने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

श्रावणातील प्रत्येक सोमवार हा भगवान महादेवाच्या उपासनेसाठी विशेष मानला जातो. त्यामुळे तिसऱ्या श्रावण सोमवारी पंचमुखी महादेवाचे दर्शन घेण्यासाठी महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच तरुण भाविक मोठ्या संख्येने मंदिरात दाखल झाले. अनेक भाविकांनी महादेवाला जलाभिषेक, दुग्धाभिषेक तसेच बेलपत्र अर्पण करून मनोभावे पूजा केली.

मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. भाविकांनी शांततेत दर्शन घेत भगवान महादेवाचे आशीर्वाद घेतले.



श्रावण सोमवारनिमित्त मंदिरात विविध धार्मिक विधी आणि पूजाअर्चा करण्यात आली. भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे मंदिर परिसरात काही काळ मोठी वर्दळ निर्माण झाली होती. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी स्वयंसेवकांकडूनही आवश्यक व्यवस्था करण्यात आली. श्रावणातील पुढील सोमवारनिमित्तही पंचमुखी महादेव मंदिरात मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता असून, मंदिर परिसरातील स्वच्छता, पिण्याचे पाणी, वाहतूक व दर्शन रांगेची व्यवस्था अधिक सक्षम करण्याची अपेक्षा भाविकांकडून व्यक्त होत आहे.

**छायाचित्र किरण खानापुरे**

## मत्स्योदरी पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आठवडाभराचा इंडक्शन कार्यक्रम उत्साहात

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या तंत्रनिकेतन येथे प्रथम वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आठवडाभराच्या प्रेरण प्रशिक्षण () कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणासोबतच शैक्षणिक, व्यावसायिक, कौशल्यविकास आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध पैलूंची ओळख करून देणे, तसेच त्यांच्या भावी करिअरला योग्य दिशा देणे, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

आठवडाभर चाललेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्टिकोन, करिअर नियोजन, कौशल्यविकास, उद्योजकता, औद्योगिक क्षेत्रातील बदलत्या संधी, संवादकौशल्य, व्यावहारिक ज्ञान, समस्या सोडविण्याची क्षमता, टीमवर्क आणि आत्मविश्वास या विविध विषयांवर मार्गदर्शन मिळाले. शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ प्रा. महेश पाटील यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून सातत्याने ज्ञान व कौशल्ये आत्मसात करावीत आणि आपल्या आवडी व क्षमतेनुसार भविष्यातील ध्येय निश्चित करावे, असे आवाहन केले. प्रसिद्ध उद्योजक सुशांत देशमुख यांनी बदलत्या औद्योगिक क्षेत्रातील गरजा, कौशल्यविकास आणि उद्योजकतेच्या विविध संधींची माहिती देत विद्यार्थ्यांनी नोकरीच्या पारंपरिक संधींसोबतच स्वयंरोजगार व व्यवसायाच्या क्षेत्राचा विचार करावा, असे सांगितले. प्रा. एम. बी. सानप यांनी तांत्रिक शिक्षणासोबत संवादकौशल्य, व्यावहारिक ज्ञान, समस्या सोडविण्याची क्षमता, टीमवर्क आणि आत्मविश्वास या कौशल्याचे महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध जोडत सर्वांगीण विकास साधावा, असे मार्गदर्शन केले.

या आठवडाभराच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार होते. कार्यक्रमाची प्रस्तावना पॉलिटेक्निक प्रभारी प्रा. ए. पी. दवणे यांनी केली, तर प्रथम वर्षाचे विभागप्रमुख प्रा. पी. ए. भाकडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन सिव्हिल विभागाचे प्राध्यापक प्रा. सतीश डिघुळे यांनी केले.

आठवडाभराच्या या प्रेरण प्रशिक्षणामुळे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरण, अभ्यासक्रम, तांत्रिक शिक्षणातील संधी, कौशल्यविकास, उद्योजकता आणि करिअर नियोजन याबाबत उपयुक्त माहिती व मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

## जिल्हास्तरीय संस्कृत स्पर्धेत प्रणवी भिसेचा प्रथम क्रमांक

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील ऐतिहासिक श्रीराम संस्कृत विद्यालय (पाठशाळा),ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय व अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत दिनानिमित्त आयोजित संस्कृत पाठांतर स्पर्धेत ऑक्सफोर्ड स्कूलची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी प्रणवी राजेश भिसे हिने प्रथम क्रमांक पटकावला. व्यासपीठावर महापालिकेच्या महिला व बालविकास सभापती संध्याताई देठे, नगरसेविका रीमाताई खरात, परीक्षक सुरेखा गव्हाणे उपस्थित होते.




स्पर्धेत प्राविण्य प्राप्त १७ व इयत्ता ९ वी व १० वी च्या ०९ विद्यार्थांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. यावर्षी एकूण ३०४ विद्यार्थांनी स्पर्धेत सहभाग घेतला तर एकूण ६२ विद्यार्थांनी परितोषिके देण्यात आली. सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार जयश्री कुलकर्णी यांनी मानले. याप्रसंगी सुधाकर वाहेगावकर, श्रीकांत शेलगावकर, कल्याणी कुलकर्णी, सुर्यकांत रत्नपारखी *(पान २ वर)*

# संपादकीय...

## मोती तलावातील मृत्यू केवळ दुर्घटना नाही; सुरक्षेचा गंभीर इशारा!

जालना शहरातील मोती तलावात मासेमारीसाठी गेलेल्या शेख बशीर शेख याशीन या तरुणाचा पाण्यात बुडून झालेला मृत्यू मन हेलावून टाकणारा आहे. चार मित्रांसोबत मासेमारीसाठी गेलेल्या तरुणाचा अचानक पाण्यात बुडून मृत्यू होणे ही केवळ एका कुटुंबावर कोसळलेली शोकांतिका नाही, तर शहरातील जलाशयांच्या सुरक्षिततेबाबत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आल्याचा इशाराही आहे. मृत्यूच्या घटनेनंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत सुमारे तासभर शोधमोहीम राबवली आणि बोटीच्या सहाय्याने मृतदेह बाहेर काढला. जवानांचे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. मात्र, प्रश्न असा आहे की बचाव पथक दुर्घटनेनंतर पोहोचण्यापेक्षा दुर्घटना होऊच नये यासाठी प्रतिबंधात्मक व्यवस्था आधीपासून का नसावी? शहरातील तलाव, बंधारे आणि जलाशय हे नागरिकांसाठी आकर्षणाचे ठिकाण असू शकतात; मात्र त्यामध्ये पाण्याची खोली, चिखल, अचानक बदलणारी पाण्याची पातळी आणि इतर धोके असू शकतात. विशेषतः पाण्याची खोली माहीत नसताना तलावात उतरणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. मासेमारीसाठी नागरिक तलावाच्या काठावर किंवा पाण्यात जात असतील, तर प्रशासनाने या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. 'लोक स्वतःच्या जबाबदारीवर जातात' एवढे सांगून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. ज्या ठिकाणी वारंवार नागरिकांची वर्दळ असते, तेथे संभाव्य धोके ओळखून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

मोती तलाव परिसरात पाण्यात उतरण्यास मनाई, पाण्याची खोली, धोकादायक भाग, मासेमारीबाबतचे नियम किंवा आपत्कालीन संपर्क क्रमांक दर्शविणारे स्पष्ट आणि मोठे सूचना फलक आहेत का, हा प्रश्न आता उपस्थित होणे स्वाभाविक आहे. असतील तर ते नागरिकांच्या नजरेस पडतात का? नसतील तर ते तातडीने लावणे गरजेचे आहे.

फलक लावणे ही छोटी उपाययोजना वाटू शकते; परंतु अनेकदा वेळेवर दिलेला इशारा एखाद्याचा जीव वाचवू शकतो.

तलावाच्या ज्या भागात पाणी खोल आहे किंवा जिथे उतरणे धोकादायक आहे, त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार बॅरिकेडिंग करणे, रात्री प्रकाशव्यवस्था करणे आणि महत्त्वाच्या ठिकाणी निगराणी ठेवणे गरजेचे आहे. विशेषतः सुट्टीचे दिवस, सण-उत्सव किंवा पावसाळ्यात जलाशय परिसरात नागरिकांची गर्दी वाढते. अशा काळात प्रशासनाने विशेष दक्षता घेणे अपेक्षित आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर अग्निशमन दलाला बोलावून शोधमोहीम राबविणे ही बचावाची व्यवस्था आहे; पण संभाव्य दुर्घटना रोखणे ही प्रशासनाची खरी कसोटी आहे.

प्रशासनाला प्रश्न विचारताना नागरिकांची जबाबदारीही दुर्लक्षित करता येणार नाही. पाण्याची खोली माहीत नसताना तलावात उतरणे, पोहण्याचा सराव नसताना खोल पाण्यात जाणे किंवा मासेमारीसाठी धोकादायक भागात प्रवेश करणे टाळले पाहिजे. विशेषतः लहान मुले आणि तरुण तलाव परिसरात असताना पालक व मित्रांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. 'काही होणार नाही' हा निष्काळजीपणा कधी जीवघेणा ठरेल सांगता येत नाही. मोती तलावातील या घटनेनंतर केवळ पंचनामा करून किंवा मृत्यूची नोंद करून विषय संपवणे योग्य ठरणार नाही. महानगरपालिका, जिल्हा प्रशासन, पोलीस आणि अग्निशमन विभागाने संयुक्तपणे शहरातील प्रमुख तलाव व जलाशयांचे सुरक्षा ऑडिट करणे गरजेचे आहे. कोणत्या ठिकाणी पाणी खोल आहे? कोठे नागरिकांचा प्रवेश जास्त आहे? कोठे बॅरिकेडिंग आवश्यक आहे? कोठे सूचना फलक नाहीत? आपत्कालीन परिस्थितीत बचाव पथक किती वेळात पोहोचू शकते? बोटी, लाइफ जॅकेट आणि बचाव साहित्य उपलब्ध आहे का? या प्रश्नांची उत्तरे शोधून त्यानुसार कायमस्वरूपी व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने आपल्या व्यवस्थेत एखादी दुर्घटना घडली की काही दिवस चर्चा होते, जबाबदारीचे प्रश्न उपस्थित होतात आणि नंतर काही काळाने विषय विस्मरणात जातो. पुढची दुर्घटना घडली की पुन्हा तेच प्रश्न उपस्थित होतात. ही साखळी आता थांबली पाहिजे. शेख बशीर यांच्या मृत्यूने एका कुटुंबाचा आधार हिरावला आहे. हा मृत्यू परत आणता येणार नाही. मात्र, या घटनेतून धडा घेऊन भविष्यातील दुर्घटना टाळता येऊ शकतात. मोती तलाव परिसराचा विकास, सुशोभीकरण किंवा नागरिकांसाठी वापर वाढविण्याचा विचार होत असेल, तर त्यासोबत सुरक्षा आराखडाही तेवढाच महत्त्वाचा असला पाहिजे. दुर्घटना घडल्यावर बचावकार्य करणे ही जबाबदारी आहे; पण दुर्घटना टाळण्यासाठी आधीच व्यवस्था उभी करणे ही प्रशासनाची दूरदृष्टी आहे. शेख बशीर यांच्या दुर्दैवी मृत्यूकडे केवळ एक अपघाती घटना म्हणून पाहिले गेले, तर या घटनेतून मिळणारा सर्वांत महत्त्वाचा धडा आपण गमावू. त्यांच्या मृत्यूची आठवण म्हणून मोती तलावासह शहरातील सर्व जलाशयांची सुरक्षा व्यवस्था मजबूत झाली, तरच या शोकांतिकेला काही अर्थ प्राप्त होईल. आता प्रश्न 'पुढचा अपघात कधी?' हा नसावा; प्रश्न असा असला पाहिजे. 'पुढचा अपघात होऊ नये यासाठी प्रशासन आज काय करणार?'

# पैठणी साडीवर बारकोड; अस्सलतेला मिळणार सरकारी संरक्षण!

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेची आणि कलात्मक वारशाची ओळख असलेली पैठणी ही केवळ साडी नसून महाराष्ट्राच्या वस्त्रकलेचा अभिमान आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रचना, आकर्षक रंगसंगती, जर व रेशमी विणकामामुळे पैठणीला देशभरात मोठी मागणी आहे. मात्र, या वाढत्या मागणीचा गैरफायदा घेत बाजारात बनावट, अर्धवट किंवा कमी दर्जाच्या साड्या 'पैठणी'च्या नावाखाली विकल्या जाण्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी पैठणीवर बारकोड आणि लोगो देण्याचा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे.

खरी पैठणी तयार करण्यासाठी कारागिरांना मोठा वेळ, कौशल्य आणि मेहनत घ्यावी लागते. एका पैठणीच्या निर्मितीसाठी अनेक दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे अस्सल पैठणीची किंमतही तिच्या दर्जानुसार असते. परंतु ग्राहकाला खरी आणि बनावट पैठणी यातील फरक सहज ओळखता येत नसल्याने अनेकदा तो अधिक पैसे देऊनही निकृष्ट वस्तू खरेदी करतो. याचा थेट परिणाम ग्राहकांबरोबरच पारंपरिक पैठणी विणकरांवरही होतो.

बारकोड आणि अधिकृत लोगोमुळे ग्राहकाला साडीची अस्सलता तपासणे सुलभ होईल, तसेच बनावट पैठणी विकणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे प्रशासनालाही शक्य होईल. या योजनेमुळे पैठणीच्या नावाचा गैरवापर रोखण्याबरोबरच महाराष्ट्राच्या पारंपरिक हस्तकलेला विश्वासार्ह बाजारपेठ मिळण्यास मदत होईल.

मात्र, केवळ बारकोड लावून प्रश्न सुटणार नाही. त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे, बारकोडची पडताळणी करणारी यंत्रणा सुलभ असणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच पैठणी विणकरांना आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ, प्रशिक्षण आणि आर्थिक मदत उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे.

ग्राहकांची फसवणूक रोखणे आणि कारागिरांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळवून देणे, या दोन्ही उद्देशांनी हा निर्णय महत्त्वाचा ठरू शकतो. महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या पैठणीची ओळख, गुणवत्ता आणि परंपरा जपण्यासाठी सरकार, कारागीर, व्यापारी आणि ग्राहक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. बारकोडमुळे पैठणीची केवळ ओळख पटू नये, तर तिच्या अस्सलतेवर ग्राहकांचा विश्वासही अधिक दृढ व्हावा, हीच अपेक्षा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## बाल मनातील श्रावणमास

श्रावण मास येता चैतन्य फुलतो
आमच्या चेह-यावर आनंद झळतो
पावसाच्या सरी अंगावर बरसतो
चिखलात आम्ही झिम्मा खेळतो

ऊन-पावसाचा खेळ चालतो
आकाशात इंद्रधनुष्य खुलतो
सप्तरंगाची उधळण करतो
आईच्या साडीची उपमा देतो

तान्हा पोळ्याची रेस लावतो
नंदीबैल जणू डौलात सजतो
पुरणपोळीचा मुखी नैवद्य भरतो
बोजा-याच्या नाणींनी खिसा फुगतो

दुकानात आम्ही रेलचेल करतो
खाऊंच्या खरेदीत गोंधळ उडतो
चॉकलेट कुरकु-यांचा स्वाद जडतो
जेवनाकडे आम्ही पाठ फिरवतो

लिपिकासम सुनील कलम चालवितो
लहान सहानांची अबोल प्रित रेखाटतो
शब्दशब्दांची माला हा गुंफतो
बाल मनातील कविता साकारतो

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

अलीकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात.

आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत.

## पान १ वरुन...

### गणेशोत्सव, नवरात्रोत्सव...

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्ती विसर्जनस्थळांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गर्दी लक्षात घेता संबंधित ठिकाणी सुरक्षितता, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पाणी, मार्गदर्शन आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे. गणेशमूर्ती विसर्जनासाठी निश्चित करण्यात आलेल्या स्थळांची पाहणी करून तेथील परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि आवश्यक ती कामे वेळेत पूर्ण करावीत, अशा सूचना देण्यात आल्या. गणेशोत्सव आणि त्यानंतर नवरात्रोत्सव व दिवाळीच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. गर्दीच्या ठिकाणी आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने मदत उपलब्ध व्हावी, यासाठी आरोग्य विभागाने योग्य नियोजन करावे, अशी भूमिका मांडण्यात आली. सणासुदीच्या काळात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याच्या सूचना उपमहापौर राजेश राऊत यांनी दिल्या. स्वच्छता, आरोग्य, विद्युत, बांधकाम, पाणीपुरवठा, अग्निशमन आणि अतिक्रमण विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या निश्चित करून वेळेत कामे पूर्ण करावीत. केवळ कागदोपत्री तयारी न करता प्रत्यक्ष मैदानात उतरून परिस्थितीचा आढावा घ्यावा, यावर बैठकीत भर देण्यात आला. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळी हे नागरिकांच्या उत्साहाचे आणि मोठ्या सार्वजनिक सहभागाचे सण आहेत. या काळात स्वच्छता, सुरक्षितता आणि मूलभूत सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक तयारी करण्यात येत आहे. सण शांततेत, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावेत यासाठी प्रशासन आणि नागरिकांनीही परस्पर सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. बैठकीस नगरसचिव केशव कानपुडे, स्वच्छता व अतिक्रमण सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, नगर अभियंता सय्यद सउद, पाणीपुरवठा अभियंता बगळे, विद्युत अभियंता कोमल गावंडे, अग्निशमन अधिकारी पानपट्टे यांच्यासह महानगरपालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, सणांच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या या बैठकीत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा झाली असली तरी, आता या सूचनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत वेगाने होते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः विसर्जनस्थळांची सुरक्षितता, रस्त्यांवरील खड्डे, बंद पथदिवे, स्वच्छता आणि मोकाट जनावरांचा प्रश्न वेळेत मार्गी लागल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. सण जवळ येण्यापूर्वी सर्व आवश्यक कामे पूर्ण करून शहरातील नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधायुक्त वातावरण उपलब्ध करून देण्याचे आव्हान आता महानगरपालिका प्रशासनासमोर आहे.

### शनी मंदिर...

असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत वाहतूक पोलिसांची नियुक्ती करून वाहतूक सुरळीत करण्याची आवश्यकता आहे.

दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा वेळ वाया जात असून, भविष्यात आपत्कालीन वाहनांनाही अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन शनी मंदिर चौकातील वाहतूक कोंडी कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### परतूर शहरात अवैध...

करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये राजनिवास सुगंधी पानमसाला व जर्दा (किंमत १४,००० रुपये), विमल पानमसाला व तंबाखू (किंमत ४,००० रुपये), गोवा गुटखा (किंमत ६,००० रुपये) आणि ५०,००० रुपये किमतीची हिरो पॅशन मोटारसायकल असा एकूण ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला. सदर गुटखा मानवी जीवितास अपायकारक असल्याचे माहीत असूनही स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चोरटी वाहतूक व विक्री करणाऱ्या काजी रफियोद्दीन खुर्शिद काजी (वय ३५, रा. काजी गल्ली, परतूर) याच्याविरुद्ध पोलीस अमलदार गोविंद पवार यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेचे कलम २२३, २७५ अन्वये परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल जनार्धन पालवे हे करत आहेत.

### जालना जिल्ह्यातील....

मतदार ३,३८,९३६
१०३-भोकरदन मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म २,८७,८६०
तर न गोळा झालेले फॉर्म ३८,३०७ आणि एकूण मतदार
३,२६,१६७ असे एकूण डिजिटल केलेले फॉर्म
१४,३९,५३६ तर न गोळा झालेले फॉर्म २,४३,१८७
आणि एकूण मतदार १६,८२,७२३ आहेत. यामध्ये जालना विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ५८ हजार ६३७ मतदार, तर भोकरदन मतदारसंघात सर्वाधिक कमी ३ लाख २६ हजार १६७ मतदार असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. परतूर मतदारसंघात ३ लाख ३० हजार ३७७, घनसावंगीत ३ लाख २८ हजार ६०६ आणि बदनापूरमध्ये ३ लाख ३८ हजार ९३६ मतदार आहेत. ० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करता येणार*

मतदारयादी तयार करण्यासाठी पात्रता दिनांक १ ऑक्टोबर २०२६ निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांना मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित दावा दाखल करता येणार आहे. तसेच प्रारूप मतदारयादीमध्ये नावाचा समावेश करण्याबाबत कोणताही दावा अथवा नावाच्या समावेशाबाबत आक्षेप असल्यास तोही विहित मुदतीत दाखल करता येणार आहे. दावे-हरकतींसाठी ३० सप्टेंबर २०२६ ही अंतिम तारीख आहे. यासाठी संबंधित प्रकरणानुसार फॉर्म क्रमांक ६, ७ किंवा ८ मध्ये अर्ज दाखल करता येणार आहे. तसेच, ज्या नागरिकांचे वय २०२६ मध्ये वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यास पात्र आहे, त्यांनी पात्रता दिनांक १ ऑक्टोबर २०२६ लक्षात घेऊन मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आवश्यक दावा दाखल करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अशा दाव्यांचा संबंधित वर्षाच्या पात्रता तारखेनुसार विचार करून त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे.

**दावे-हरकती कुठे दाखल कराव्यात?**

नागरिकांना आपले दावे, हरकती अथवा अपील संबंधित मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात, तसेच संबंधित निवडणूक विभागाच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी () यांच्याकडे दाखल करता येणार आहेत. यासाठी संबंधित कार्यालयात अथवा  यांच्याकडे आवश्यक अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मतदारांनी प्रारूप मतदारयादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही, तसेच नाव, पत्ता व इतर तपशील योग्य आहेत का, याची पडताळणी करून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दुरुस्ती अथवा हरकत नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

***मतदारसंघनिहाय संपर्क कार्यालये***

दावे व हरकती दाखल करण्यासाठी संबंधित मतदारसंघातील कार्यालयांचा तपशीलही प्रशासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार परतूर विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परतूर यांचे कार्यालय; अंबड विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबड यांचे कार्यालय; जालना विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जालना यांचे कार्यालय; बदनापूर विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी बदनापूर तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना आणि भोकरदन विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भोकरदन यांचे कार्यालय येथे अर्ज करता येणार आहेत. अंतिम यादीपूर्वी निर्णय प्रक्रिया प्राप्त दावे व हरकतींवर संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून निर्णय घेण्यात येणार आहे. याबाबत ३१ ऑगस्ट २०२६ ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असून, निर्णयानंतर पात्र दावे व हरकतींच्या आधारे मतदारयादीत आवश्यक बदल केले जातील.

दरम्यान, मतदारयादीबाबत संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयानंतरही मतदारांना नियमानुसार अपील करण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना यांच्याकडे नियमानुसार अपील दाखल करता येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मतदारांनी प्रारूप मतदारयादीची तपासणी करून आपले नाव व तपशील अचूक असल्याची खात्री करावी आणि आवश्यक असल्यास ३० सप्टेंबरपूर्वी दावे किंवा हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जालना यांनी केले आहे.

### जिल्हास्तरीय...

सुमित कुलकर्णी, कीर्ती शेलगावकर, मनोहर कुलकर्णी, संदीप नेरकर, अमोल कुलकर्णी, मीरा बोधे, शैलेन्द्र बदनापुरकर, रेणुका गुलापेल्ली आदी उपस्थित होते.

# उत्सव भक्तीचा, सन्मान संस्कृतीचा डी.जे.मुक्त गणेशोत्सव-काळाची गरज

गणेशोत्सवातील डी.जे. संस्कृतीला फाटा आणि पारंपरिकतेचा गणेशोत्सव हा केवळ महाराष्ट्राचाच नव्हे, तर संपूर्ण भारताचा एक अस्सल सांस्कृतिक आणि भावनिक सोहळा आहे. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये होणारी सुखकर्त्या-दुःखहर्त्या बाप्पाची स्थापना प्रत्येकाच्या मनात एक नवा उत्साह, चैतन्य आणि आनंद घेऊन येते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी स्वातंत्र्यलढ्यात समाजाला एकत्र आणण्यासाठी, लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागी करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. एकत्र येणे, विचारांची देवाणघेवाण करणे आणि अन्यायाविरुद्ध एकत्र लढणे हा या उत्सवाचा मूळ गाभा होता. परंतु, काळाच्या ओघात या उत्सवाचे स्वरूप बदलत गेले आणि गेल्या काही वर्षांत 'डी.जे.' (डिजिटल जॉकी) नावाच्या पाश्चात्त्य संगीत संस्कृतीने आपल्या या पवित्र आणि पारंपरिक उत्सवाला विळखा घातला आहे. बाप्पाच्या आगमनाचा आणि विसर्जन मिरवणुकीचा आनंद आता कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात आणि धांगडधिंग्यात शोधला जाऊ लागला आहे. अशा परिस्थितीत, डी.जे.चा वाद टाळून, शांततेत आणि पारंपरिक पद्धतीने गणेश स्थापना करणे ही काळाची अत्यंत मोठी गरज बनली आहे.गणेशोत्सव हा भक्तीचा आणि मांगल्याचा उत्सव आहे. गणरायाचे आगमन होताना मनात कृतज्ञता आणि आदराची भावना असायला हवी. परंतु, आजकाल सार्वजनिक मंडळांच्या मिरवणुकीत लावण्यात येणारे मोठमोठे साऊंड सिस्टीम आणि डी.जे.चे बेस () यामुळे उत्सवाचे हे पावित्र्य धोक्यात आले आहे. डी.जे.वर वाजवली जाणारी गाणी अनेकदा भक्तीरसापासून दूर, उथळ आणि थिल्लर प्रकारची असतात. ज्या गाण्यांचा देवाशी किंवा आपल्या संस्कृतीशी दुरान्वयेही संबंध नसतो, अशा गाण्यांवर तरुणाई बेभान होऊन नाचताना दिसते. यामुळे उत्सवातील भक्तीभाव लोप पावून त्याचे रूपांतर एका व्यावसायिक आणि गोंगाटाच्या कार्यक्रमात होताना दिसत आहे. बाप्पाच्या मूर्तीसमोर चालणारा हा अश्लील आवाजाचा थयथयाट खरोखरच बाप्पाला तरी आवडेल का, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. डी.जे.चा वाद केवळ गाण्यांच्या प्रकारापुरता मर्यादित नसून, तो दोन मंडळांमधील प्रतिष्ठेचा आणि ईर्षेचा विषय बनला आहे. ''कोणाचा डी.जे. मोठा आणि कोणाचा आवाज जास्त?'' या चढाओढीतून अनेकदा वाद, हाणामाऱ्या आणि सामाजिक शांततेचा भंग होतो.डी.जे.च्या या अतिरेकी वापरामुळे सामाजिक आरोग्यावर अत्यंत घातक परिणाम होत आहेत. साऊंड सिस्टीममधून निघणाऱ्या हाय-डेसिबल (-) लहरी मानवी शरीरासाठी अत्यंत हानिकारक आहेत. या तीव्र आवाजामुळे लहान मुले, वृद्ध, गरोदर महिला आणि रुग्णांना प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागतो. अनेकांना हृदयविकाराचा झटका आल्याच्या, कायमचे बहिरेपण आल्याच्या किंवा मानसिक संतुलन बिघडल्याच्या घटना दरवर्षी गणेशोत्सवात ऐकायला मिळतात. उत्सवाच्या नावाखाली आपल्याच समाजातील दुर्बल घटकांच्या आरोग्याशी खेळणे हा कुठला धर्म आणि कुठली संस्कृती? पक्षी आणि पाळीव प्राणीही या आवाजाने भयभीत होतात. तसेच, ध्वनी प्रदूषणामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होतो. न्यायालयाने आणि प्रशासनाने रात्री १० नंतर ध्वनीक्षेपकांवर बंदी घातली असली, तरी अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन केले जाते, ज्यामुळे पोलिसांवरही ताण येतो. हा सर्व वाद आणि त्रास टाळण्यासाठी डी.जे.ला पूर्णपणे नाकारणे अत्यंत आवश्यक आहे.डी.जे.ला पर्याय म्हणून आपल्याला आपल्या समृद्ध पारंपरिक वाद्यांकडे पुन्हा वळावे लागेल. महाराष्ट्राला ढोल-ताशा, लेझिम, झांज आणि संबळ यांसारख्या पारंपरिक वाद्यांचा मोठा वारसा लाभला आहे. ढोल-ताशांच्या




एका लयीतील आवाजात आणि तालात एक वेगळीच ऊर्जा असते. हा आवाज कानठळ्या बसवणारा नसतो, तर तो अंगात रोमांच उभे करणारा आणि मनाला प्रफुल्लित करणारा असतो. आज महाराष्ट्रात हजारो तरुणांची ढोल-ताशा पथके कार्यरत आहेत. या पथकांमध्ये शिस्त, संस्कृती आणि एकोपा पाहायला मिळतो. पारंपरिक पोषाख परिधान करून, कपाळावर टिळा लावून जेव्हा ही पथके रस्त्यावर उतरतात, तेव्हा संपूर्ण वातावरण मांगल्याने भरून जाते. ढोल-ताशांच्या गजरात बाप्पाची स्थापना करणे किंवा विसर्जन करणे हे डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. याशिवाय भजन, कीर्तन, गोंधळ आणि पारंपरिक लोककला यांच्या माध्यमातून आपण उत्सवाचे मूळ स्वरूप जिवंत ठेवू शकतो. हे संगीत मनाला शांतता देते आणि ईश्वराशी जोडते.डी.जे.वर होणारा अवाढव्य खर्च वाचवून तो पैसा सामाजिक कल्याणासाठी वापरला, तर तो खऱ्या अर्थाने बाप्पाचा उत्सव ठरेल. एका गणेशोत्सवात डी.जे. आणि साऊंड सिस्टीमच्या भाड्यापोटी लाखो रुपये खर्च केले जातात. हा पैसा समाजातील गरजू घटकांसाठी वापरता येऊ शकतो. उदाहरणार्थ, मंडळांनी जमा झालेल्या वर्गणीतून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करावी, अनाथालयांना अन्नधान्य पुरवावे किंवा ग्रामीण भागातील शाळांना संगणक आणि पुस्तके भेट द्यावीत. सध्याच्या काळात आरोग्य सेवा खूप महाग झाल्या आहेत, अशा वेळी मंडळांनी मोफत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे आयोजित करावीत किंवा एखाद्या गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णाच्या उपचाराचा खर्च उचलावा. जेव्हा आपण एखाद्या भुकेलेल्याला अन्न देतो किंवा एखाद्याच्या चेहऱ्यावर हसू आणतो, तेव्हाच बाप्पा खऱ्या अर्थाने प्रसन्न होतो. पैशांचा हा विधायक वापर समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाईल.यासोबतच, यंदाचा गणेशोत्सव 'पर्यावरणपूरक आणि प्रबोधनपर' बनवण्याचा संकल्प आपण केला पाहिजे. डी.जे.च्या गोंगाटाऐवजी मंडळांनी सामाजिक, ऐतिहासिक आणि चालू घडामोडींवर आधारित जिवंत देखावे किंवा माहितीपट सादर करावेत. यामुळे येणाऱ्या भाविकांचे प्रबोधन होईल आणि तरुण पिढीला आपल्या इतिहासाची, संस्कृतीची माहिती मिळेल. जलप्रदूषण रोखण्यासाठी शाडूच्या मातीची मूर्ती स्थापित करणे, नैसर्गिक रंगांचा वापर करणे आणि मूर्तीचे विसर्जन कृत्रिम हौदात किंवा घरच्या घरी करणे या गोष्टींवर भर दिला पाहिजे. निर्माल्य नदीत न टाकता त्याचे खत बनवून निसर्गाचे रक्षण केले पाहिजे. जेव्हा आपण निसर्गाचा आदर करतो, तेव्हा आपण बाप्पाचाच आदर करत असतो.हा बदल घडवून आणण्यासाठी केवळ कायदे किंवा प्रशासनावर अवलंबून राहून चालणार नाही, तर समाजातील प्रत्येक घटकाने, विशेषतः तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांनी स्वयंस्फूर्तीने ''आमच्या मंडळात डी.जे. लावणार नाही'' अशी प्रतिज्ञा केली पाहिजे. पालकांनी आपल्या मुलांना पारंपरिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. सोशल मीडियाच्या माध्यमातून 'डी.जे.मुक्त गणेशोत्सव' ही चळवळ अधिक तीव्र केली पाहिजे. शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा होणारा उत्सव हा अधिक आकर्षक आणि प्रतिष्ठित मानला गेला पाहिजे.शेवटी, गणेशोत्सव हा आनंदाचा आणि सौहार्दाचा उत्सव आहे. हा आनंद दुसऱ्याला त्रास देऊन किंवा निसर्गाला हानी पोहोचवून मिळवता येत नाही. बाप्पा हा बुद्धीची आणि विवेकाची देवता आहे. त्यामुळे आपण आपल्या विवेकाचा वापर करून या उत्सवातील विकृती दूर केली पाहिजे. यंदाच्या गणेशोत्सवात डी.जे.चा कर्णकर्कश आवाज थांबवूया आणि पारंपरिक वाद्यांच्या निनादात, भक्तीभावाच्या वातावरणात, लेझिमच्या ठेक्यात बाप्पाचे स्वागत करूया. चला, आपण सर्व मिळून प्रतिज्ञा करूया की, यंदाचा गणेशोत्सव हा अधिक पर्यावरणपूरक, शांत, सुजाण आणि संस्कृतीची जपणूक करणारा असेल. तरच लोकमान्य टिळकांना अपेक्षित असलेला आदर्श समाज घडण्यास मदत होईल. बाप्पाच्या आगमनाचा हा सोहळा सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्य घेऊन येवो, हीच गणरायाच्या चरणी प्रार्थना!



दिलीप देशपांडे.
जामनेर. जिल्हा जळगाव.
८९९९५६६९१७

## शून्यातून उभा राहिलेला 'फौजी' २७ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला

शारीरिक अडचणींमुळे भारतीय लष्करात भरती होण्याचे स्वप्न पूर्ण करू न शकलेल्या घनश्याम येडे यांनी सैनिकांच्या शौर्य, त्याग आणि संघर्षाची कहाणी रुपेरी पडद्यावर मांडली आहे. त्यांच्या जिद्दीने आणि देशप्रेमातून साकारलेला मराठी चित्रपट 'फौजी' येत्या २७ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. घनश्याम येडे यांचा देशसेवेचा प्रवास कॉलेजमधील एनसीसीपासून सुरू झाला. सैनिकांविषयी असलेल्या आदरातून त्यांच्या मनात 'फौजी' या चित्रपटाची संकल्पना आकाराला आली. सैनिकांचे महत्त्व आणि त्यांच्या त्यागाची गाथा घराघरांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने त्यांनी हा चित्रपट साकारण्याचा निर्णय घेतला.

या प्रवासात त्यांचे जवळचे मित्र सुहास गरगडे सहभागी झाले. मात्र नोटबंदी, कोरोना महामारी आणि आर्थिक अडचणींमुळे चित्रपटाची निर्मिती अनेकदा अडचणीत आली. चित्रपट अंतिम टप्प्यात असताना सुहास गरगडे यांचा अपघाती मृत्यू झाला. या धक्क्यानंतरही घनश्याम येडे यांनी चित्रपटाचे काम थांबवले नाही. सुहास यांचे धाकटे बंधू मयूर गरगडे यांना चित्रपटात सहभागी करून त्यांनी मित्राचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. चित्रपट पूर्ण करण्यासाठी स्वतःचे घर आणि जमीन गहाण ठेवण्याची वेळही त्यांच्यावर आली. या प्रवासात वासुदेव महाराज गरुड यांचे आशीर्वाद तसेच सतीश नाझरकर, अशोक नाझरकर, गणेश गुंजाळ, डॉ. शंकर तळबे, सुनील गावडे, अशोक गाडे, प्रवीण बुरुंगे, राजेंद्र करणे, विष्णुपंत नेवाळे, शिवाजी दडस, कोंडीबा नलावडे आणि जोतीबा घाडगे यांचे सहकार्य लाभले. घनश्याम येडे यांचे मार्गदर्शक आणि वडीलस्थानी असलेले नाथ विश्वनाथ साहेब यांनीही 'फौजी'च्या निर्मितीत मोलाचे मार्गदर्शन आणि साथ दिली. सहनिर्माती सौ. स्वप्नजा विश्वनाथ यांचेही योगदान लाभले. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या आधी नाथ विश्वनाथ साहेब गंभीर आरोग्य संकटात सापडले. त्यांच्या मुलीने स्वतःच्या शरीराचा भाग दान करून त्यांना जीवदान दिले. त्यांच्या इच्छेचा मान राखत चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली नाही. दरम्यान, एकलव्य प्रतिष्ठान आणि प्रस्तुतकर्ता सुधीरदादा पाटसकर यांनीही 'फौजी'ला पाठिंबा दिला. घनश्याम येडे यांचे देशप्रेम, साधेपणा आणि प्रामाणिकपणा पाहून प्रभावित झाल्यानंतर सुधीरदादा पाटसकर यांनी चित्रपटाला पूर्ण सहकार्य करण्याचा निर्णय घेतला. 'फौजी'मध्ये सौरभ गोखले, प्राजक्ता गायकवाड, शाहबाज खान, टीनू वर्मा, संजय खापरे, नागेश भोसले, हंसराज जगताप, अश्विनी कासार आणि घनश्याम येडे यांच्या भूमिका आहेत.




चित्रपटाच्या संगीताला शान, वैशाली माडे, बेला शेंडे, आदर्श शिंदे, उर्मिला धनगर आणि कविता राम यांच्या आवाजाची साथ लाभली आहे. सैनिकांचे शौर्य, त्याग आणि संघर्ष मांडणारा 'फौजी' २७ नोव्हेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

**छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई**

## महिनाभर पावसाची दडी; घनसावंगीतील सोयाबीन, कापूस, तूर पिके जळू लागली

**घनसावंगी -प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यात गेल्या एक महिन्यापासून समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील पिकांवर दुष्काळसदृश परिस्थिती ओढवली आहे. पावसाने दीर्घ दडी मारल्यामुळे शेतातील सोयाबीन, कापूस आणि तूर पिके करपू लागली असून अनेक भागांत उभी पिके वाळण्याच्या अवस्थेत पोहोचली आहेत. जमिनीला भेगा पडल्या असून पिकांच्या वाढीवर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे.



तालुक्यातील अनेक गावांमध्ये पावसाअभावी शेतातील आर्द्रता संपुष्टात आली आहे. विशेषतः हलक्या व मध्यम जमिनीतील पिकांची परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. सोयाबीनची पाने पिवळी पडून गळत आहेत, झाडांची वाढ खुंटली आहे आणि शेंगा भरण्याची प्रक्रिया प्रभावित झाली आहे. तुरीची रोपे वाळू लागली असून काही ठिकाणी ती पूर्णपणे सुकण्याच्या मार्गावर आहेत. कापूस पिकात फुलोरा कमी झाला असून बोंडधारणेवर परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांनी पेरणीपासून आतापर्यंत बियाणे, खत, तणनाशके, कीडनाशके, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. मात्र, अपेक्षित पाऊस न झाल्याने हा खर्च वाया जाण्याची भीती आहे. अनेक शेतकरी पिकांसाठी पावसावरच अवलंबून असल्याने सिंचनाची कोणतीही पर्यायी व्यवस्था उपलब्ध नाही. विहिरी व बोअरवेलची पाणीपातळीही कमी झाल्याने पिकांना संरक्षित पाणी देणे अनेकांना शक्य होत नाही. शेतातील दृश्य अत्यंत विदारक असून काही भागांत पिकांनी अक्षरशः अखेरचा श्वास घेण्यास सुरुवात केल्याचे चित्र आहे. उभी पिके सुकून जमिनीवर पडत आहेत, तर जमिनीवरील मोठ्या भेगा पावसाअभावी निर्माण झालेल्या तीव्र टंचाईची साक्ष देत आहेत. येत्या काही दिवसांत पाऊस झाला नाही, तर सोयाबीन, कापूस व तूर या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे. पंचनाम्याची मागणी पावसाअभावी झालेल्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करावेत, अशी मागणी होत आहे. तसेच पीकविमा योजनेंतर्गत नुकसानभरपाई मिळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, कृषी विभागाने गावपातळीवर पाहणी करावी आणि शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# एपीएमसी व एमआयडीसीतील दुहेरी कर आकारणी तात्काळ रद्द करा-सतीश पंच

### जालना व्यापारी महासंघाचे शिष्टमंडळ * जिल्हाधिकारी व मनपा आयुक्तांना भेटले

**जालना - प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) तसेच एमआयडीसी परिसरातील व्यापारी व गाळेधारकांवर जालना महानगरपालिकेकडून केली जाणारी मालमत्ता कर आकारणी पूर्णपणे बेकायदेशीर व अन्यायकारक असून, ही दुहेरी कर आकारणी त्वरित थांबवावी, अशी ठाम भूमिका जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांनी घेतली आहे. तसेच गेल्या तीन वर्षांत वसूल करण्यात आलेला कोट्यवधी रुपयांचा कर व्याजासह परत करण्यात यावा व न्यायालयाच्या निर्णयानुसार कोणताही एकच कर आकारण्यात यावा, या मागणीचे सविस्तर निवेदन जिल्हाधिकारी डॉ. आशिमा मित्तल व मनपाचे सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्याकडे सादर करण्यात आले.

या शिष्टमंडळात जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच, कॅटचे मराठवाडा अध्यक्ष हस्तीमल बंब आणि जालना जिल्हा वकील संघाचे माजी उपाध्यक्ष ॲड. महेश धनवत यांचा समावेश होता. निवेदनात मुंबई उच्च न्यायालयाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालाचा (रिट याचिका क्र. ४२७८/२०१८) तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला देण्यात आलेला असून त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम (), १९६६ च्या कलम १५९-अ सह पहिल्या



अनुसूचीच्या खंड ७(१) नुसार, ज्या भागात विशेष नियोजन प्राधिकरण (उदा. एमआयडीसी किंवा बाजार समिती) स्वतः रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता, सुरक्षा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरवते व त्यासाठी अधिभार/शुल्क वसूल करते, त्या परिसरातील भूखंड व गाळेधारकांना महानगरपालिकेच्या मालमत्ता करातून पूर्ण सूट मिळते,अशा भागात एकाच वेळी दोन संस्थांकडून दुहेरी कर वसूल करणे कायद्याच्या चौकटीत बसत नाही, असे न्यायालयाचा निकालात नमूद असल्याचे निदर्शनाला आणून देण्यात आले.

जोपर्यंत बाजार समिती स्वतः सर्व सोयी-सुविधा पुरवत आहे, तोपर्यंत मनपाने एपीएमसी परिसरातील दुकाने, गोदामे व बांधकामांवर मालमत्ता कर आकारणे व जबरदस्तीची वसुली करणे त्वरित बंद करावे, सन २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षांच्या कालावधीत मनपाने व्यापाऱ्यांकडून बेकायदेशीरपणे वसूल केलेली कर वसुलीची संपूर्ण रक्कम संबंधितांना व्याजासह परत करावी, व्यापाऱ्यांना बजावण्यात आलेल्या सर्व कर मागणी नोटीसा व वसुली कारवायांना त्वरित स्थगिती द्यावी, आधी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

**व्यापारी न्यायालयीन लढा; उभारण्याच्या पावित्र्यात**

**एपीएमसी असो की एमआयडीसी, जिथे संबंधित प्राधिकरण स्वतः पायाभूत सुविधा पुरवून शुल्क घेते, तिथे महानगरपालिकेने कर आकारणे हा व्यापाऱ्यांवर थेट अन्याय आहे. उच्च न्यायालयाच्या स्पष्ट आदेशानंतर आता मनपाने ही दुहेरी कर प्रणाली त्वरित बंद करावी; अन्यथा व्यापारी महासंघाला न्यायालयीन लढा उभारावा लागेल, असा इशारा सतीश पंच यांनी दिला आहे.**

# ब्राह्मण समाजाच्या मागण्यांसाठी आमरण उपोषण; खासदार डॉ. कल्याण काळे यांची भेट

## मोफत शिक्षण, स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी केंद्रासह विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी**

ब्राह्मण समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जालना शहरातील गांधी चमन येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाला जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी सोमवारी (३१ ऑगस्ट) भेट देऊन उपोषणकर्ते दीपक रणनवरे यांची आस्थेने विचारपूस केली. यावेळी खासदारांनी उपोषणामागील भूमिका तसेच समाजाच्या विविध मागण्या जाणून घेत शासनस्तरावर या मागण्यांची योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका व्यक्त केली.

ब्राह्मण समाजाच्या विविध मागण्या प्रलंबित असल्याचा दावा करत दीपक रणनवरे यांनी गांधी चमन येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. समाजाच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधून त्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, हा आंदोलनामागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले.




सोमवारी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी गांधी चमन येथील उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी उपोषणकर्ते दीपक रणनवरे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच आंदोलनामागील कारणे आणि मागण्यांची सविस्तर माहिती जाणून घेतली.

रणनवरे यांनी समाजाच्या विविध मागण्या खासदारांसमोर मांडल्या. विशेषतः समाजातील मुला-मुलींना संपूर्ण शिक्षण मोफत मिळावे, तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी करता यावी यासाठी स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी केंद्र सुरू करून आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

आर्थिक परिस्थितीमुळे काही विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीत अडचणी येतात. त्यामुळे समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी मांडली.

संपूर्ण शिक्षण मोफत मिळावे, स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी आणि विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साधने मिळावीत, या मागण्यांमुळे आंदोलनात शिक्षणाच्या प्रश्नाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी उपोषणकर्त्यांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या समजून घेतल्या. संबंधित मागण्यांबाबत शासनस्तरावर योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. समाजाच्या रास्त मागण्यांकडे शासनाने सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे आणि उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर योग्य तो तोडगा काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. आमरण उपोषण सुरू असल्याने या आंदोलनाकडे प्रशासनाचेही लक्ष लागले आहे. मागण्यांबाबत शासनाची भूमिका काय राहते आणि त्यावर कोणता निर्णय घेतला जातो, याकडे आता समाजातील नागरिकांचे लक्ष आहे. उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर चर्चा करून त्यावर तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत असून, आंदोलन अधिक तीव्र होण्यापूर्वी शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी भावना उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली. खासदारांच्या भेटीवेळी राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, संजय इंगळे, संजय मुथा, सुनील चौधरी, अशोक उबाळे, राजेंद्र गोरे, राजाभाऊ कुलकर्णी, रऊफ परसूवाले, कृष्णा पा. पडूळ, राम पा. सिरसाठ, ज्ञानेश्वर डुकरे, नारायण वाढेकर, सोपान तिरुखे, ज्ञानदेव इंगोले, अर्जुन भांदरगे, योगीताताई धांडगे, रघुवीर गुढे, सुरज यलगंटवार, दिनेश सुराणा, चंद्रकांत रत्नपारखी, भाऊसाहेब लकडे, राम गव्हाणे, भागवत घाटे, विक्रम चव्हाण, गणेश एखंडे, दिग्विजय धांडगे यांच्यासह ब्राह्मण समाजातील नागरिक, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ब्राह्मण समाजाच्या विविध मागण्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या आमरण उपोषणाला खासदार डॉ. कल्याण काळे यांनी भेट दिल्याने या आंदोलनाला राजकीय पातळीवरही पाठिंबा मिळाल्याचे चित्र आहे. आता शासन या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते आणि उपोषणकर्त्यांशी पुढील काळात काय चर्चा होते, याकडे लक्ष लागले आहे.

शिक्षण आणि स्पर्धा परीक्षेच्या सुविधांबरोबरच समाजाच्या इतर प्रलंबित मागण्यांवरही सकारात्मक निर्णय घेऊन आंदोलनकर्त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# जालन्यात 'भटके विमुक्त दिवस' उत्साहात साजरा

## पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांचा सहभाग; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, आरोग्य तपासणी व विविध उपक्रमांचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या निर्देशानुसार ३१ ऑगस्ट हा 'भटके विमुक्त दिवस' म्हणून जालना येथे विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व माहितीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास समाज कल्याण सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अनिता राठोड, प्रा. बी. वाय. कुलकर्णी, प्रा. अंकुश चव्हाण, विकास राठोड, विष्णुगिरी, अशासकीय सदस्य मुकेश भारद्वाज, मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक यांची उपस्थिती होती. यावेळी मुलांचे व मुलींचे शासकीय वसतिगृह येथे आरोग्य तपासणी शिबिर, व्याख्याने व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच भटके विमुक्त जाती-जमातींच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच भटके विमुक्त समाजाची संस्कृती, जीवनमूल्ये व परंपरा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक व माहितीपर उपक्रम राबविण्यात आले. आरोग्य तपासणी, आधारकार्ड नोंदणी, जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यासाठी शिबिरे आयोजित करण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आले.

मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक अनंत कदम यांनी यावेळी 'भटके विमुक्त दिवस'चे महत्त्व विशद करून विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश बहिर यांनी केले. श्रीमती स्नेहल सोनावळे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आपल्या बोलीभाषेत मनोगत व्यक्त केले. प्रा. अंकुश चव्हाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर मुख्य वक्ते प्रा. बी. वाय. कुलकर्णी यांनी भटके विमुक्त समाजाचा इतिहास, संस्कृती, सामाजिक परिस्थिती तसेच शासनाच्या विविध योजनांबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व्ही. के. चव्हाण यांनी केले. बंजारा समाजाची सांस्कृतिक ओळख असलेल्या पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, अधिकारी-कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंठा पंचायत समितीतील पांदण रस्ते, सिंचन विहिरी व घरकुल कामांच्या चौकशीची मागणी

## *कामे पूर्ण न करताच बनावट कागदपत्रांच्या आधारे बिले काढल्याचा आरोप; लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी केल्याचीही तक्रार चौकशी न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा*

**मंठा । प्रतिनिधी**

मंठा पंचायत समितीअंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेसह विविध योजनांच्या माध्यमातून सुरू असलेल्या पांदण रस्ते, अहिल्यादेवी सिंचन विहिरी, जनावरांचे गोठे तसेच रमाई, प्रधानमंत्री आवास, यशवंतराव चव्हाण आणि शबरी आवास योजनेंतर्गत घरकुलांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. कामे पूर्ण न करता बनावट कागदपत्रांच्या आधारे बिले काढण्यात आल्याचा गंभीर आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख योगेश ज्ञानेश्वर गणगे यांनी मंठा पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे.

तक्रारीची तातडीने दखल घेऊन संबंधित सर्व कामांची प्रत्यक्ष पाहणी व कागदपत्रांची तपासणी करण्यात यावी. तसेच चौकशीत दोष आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि इतर जबाबदार व्यक्तींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी गणगे यांनी केली आहे. चौकशी न झाल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.




**सिंचन विहिरींच्या कामांबाबत गंभीर आरोप**

तक्रारीनुसार, अहिल्यादेवी सिंचन विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता तसेच कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. मात्र, अनेक लाभार्थी शेतकऱ्यांना त्यांच्या कामाची रक्कम अद्याप मिळाली नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

याउलट, काही शेतकऱ्यांकडून संबंधित अधिकाऱ्यांना पैसे दिल्यानंतर काम प्रत्यक्षात न करताच बिले काढण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. काही लाभार्थ्यांकडून प्रत्येक विहिरीसाठी १५ ते २० हजार रुपयांची मागणी करून रक्कम घेतल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

हे आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून, संबंधित विहिरींची प्रत्यक्ष पाहणी, मंजूर अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तिका, कामाचे छायाचित्रण, देयके आणि लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली रक्कम यांची तपासणी केल्यास वस्तुस्थिती समोर येऊ शकते, अशी मागणी करण्यात आली आहे.

जनावरांच्या गोठ्यांच्या कामांबाबतही तक्रारीत गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी गोठ्यांची कामे पूर्ण करून आवश्यक प्रस्ताव व कागदपत्रे सादर केली आहेत. मात्र, त्यांना अद्याप देयके अदा करण्यात आलेली नसल्याचा आरोप आहे.

देयके अदा करण्यासाठी काही लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी करण्यात आली आणि मागणी पूर्ण न झाल्यामुळे त्यांची बिले रोखण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

या आरोपांची वस्तुस्थिती तपासण्यासाठी संबंधित कामांची प्रत्यक्ष पाहणी करून लाभार्थ्यांचे जबाब नोंदवावेत तसेच देयके मंजूर करण्याची संपूर्ण प्रक्रिया तपासावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मंठा पंचायत समितीअंतर्गत विविध घरकुल योजनांच्या कामांबाबतही तक्रारीत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. रमाई आवास, प्रधानमंत्री आवास, यशवंतराव चव्हाण आवास तसेच शबरी आवास योजनांच्या लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामावर संबंधित अभियंते नियमित पाहणी करीत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, मंजूर रकमेत घराचे बांधकाम पूर्ण होणे कठीण असल्याचे सांगून काही लाभार्थ्यांकडून २५ ते ३० हजार रुपये घेऊन घरकुलाचे काम पूर्ण झाल्याचा अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले जात असल्याचा आरोप आहे.

यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे, घरकुलाचे बांधकाम प्रत्यक्षात पूर्ण झाले नसतानाही वेगवेगळ्या टप्प्यांचे बनावट छायाचित्र तयार करून अथवा एकाच कामाचे फोटो संपादित करून शासनाच्या ऑनलाइन प्रणालीवर सादर करण्यात येत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या माध्यमातून लाभार्थ्यांकडून पैसे घेऊन घरकुलाची बिले काढली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे.

तक्रारीत म्हटले आहे की, विविध गावांतील काही लाभार्थी मंजूर रकमेत घराचे बांधकाम पूर्ण होत नसल्याचे सांगतात. त्याचबरोबर संबंधित अधिकारी किंवा कर्मचारीही लाभार्थ्यांना मंजूर निधीमध्ये घराचा पाया तयार करणेही अवघड असल्याचे सांगत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे काही लाभार्थी घरकुलाचे काम प्रत्यक्षात पूर्ण न करता उपलब्ध निधी काढून घेत असल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत लाभार्थी, संबंधित कर्मचारी आणि मध्यस्थ यांच्यात संगनमत आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पांदण रस्ते, सिंचन विहिरी, जनावरांचे गोठे आणि घरकुल या योजना ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. शासनाचा निधी थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून त्याचा योग्य वापर व्हावा, हा या योजनांचा उद्देश आहे.

मात्र, कामे न करता किंवा अपूर्ण कामांच्या आधारे बिले काढली जात असतील, तर शासनाच्या निधीचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना निधी न मिळाल्यास योजनांच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जातो.

त्यामुळे केवळ कागदपत्रांवर आधारित चौकशी न करता प्रत्यक्ष स्थळपाहणी करून प्रत्येक कामाची वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे

या सर्व प्रकारात संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच कामाच्या अंमलबजावणीत सहभागी असलेल्या व्यक्तींची भूमिका तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, कार्यारंभ आदेश, मोजमाप, काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, छायाचित्रे आणि देयक मंजुरी या सर्व टप्प्यांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये प्रत्यक्ष किती रक्कम जमा झाली आणि त्यानंतर लाभार्थ्यांकडून कोणत्याही व्यक्तीने पैसे घेतले आहेत का, याचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

योगेश ज्ञानेश्वर गणगे यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या तक्रारीत पंचायत समितीअंतर्गत सुरू असलेल्या सर्व संबंधित कामांची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे. चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी न झाल्यास मंठा पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, तक्रारीत करण्यात आलेले आरोप गंभीर असल्याने पंचायत समिती प्रशासन या प्रकरणाची काय दखल घेते, याकडे आता मंठा तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. आरोपांची सत्यता तपासण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी झाल्यास कामे प्रत्यक्षात किती झाली, कोणत्या कामांची बिले काढण्यात आली, लाभार्थ्यांना किती निधी मिळाला आणि अनियमितता झाली आहे का, याचे चित्र स्पष्ट होऊ शकते.

विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील गरीब व गरजू नागरिकांसाठी असलेल्या घरकुल, सिंचन आणि रोजगार हमीच्या योजनांमध्ये गैरप्रकार झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र, तक्रारीतील आरोपांची अधिकृत चौकशी होऊन निष्कर्ष समोर येईपर्यंत त्यांना आरोप म्हणूनच पाहणे आवश्यक आहे.

आता मंठा पंचायत समिती प्रशासन या तक्रारीची चौकशी कधी सुरू करते आणि चौकशीत काय निष्पन्न होते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.